संशोधन आराखडा

नांदेड जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम विभागा अंतर्गत काम करणाऱ्या कामगारांच्या आर्थिक परिस्थितीचा अभ्यास

(2010-11 ते 2020-21)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव विज्ञान विद्याशाखेंतर्गत अर्थशास्त्र विषयातील पीएच.डी. पदवीसाठी सादर केलेल्या शोधप्रबंधाचा आराखडा

संशोधक

सय्यद फैसलोद्दिन आरिफोद्दिन

मार्गदर्शक

प्रा. डॉ.आर. व्ही. कीर्तनकार

सहयोगी प्राध्यापक व संशोधक मार्गदर्शक, अर्थशास्त्र विभाग

नारायणराव वाघमारे महाविद्यालय,

आ. बाळापुर ता. कळमनुरी जि. हिंगोली

संशोधन केंद्र

सामाजिकशास्त्रे संकुल

स्वा. रा. ती. म. विद्यापीठ,

२०२१

नांदेड जिल्हयातील सार्वजनिक बांधकाम विभागा अंतर्गत काम करणाऱ्या कामगारांच्या आर्थिक परिस्थितीचा अभ्यास

प्रस्तावना :-

भारत हा कृषी प्रधान देश आहे. भारतातील अन्न सुरक्षा आणि ग्रामीण भागातील जीवनमान उंचावण्यास कृषी क्षेत्राचा विकास महत्त्वाचा आहे, तसेच भारतातील एकूण लोकसंख्येपैकी 60% लोकसंख्या ही ग्रामीण भागात राहते. ग्रामीण भागातील लोकांचा मुख्य व्यवसाय हा शेती आणि शेतीशी निगडित आहे. सन 2011 च्या जनगणनेनुसार भारताची एकुण 100% कामगारांपैकी 60% कामगार हे शेती क्षेत्रावर अवलंबून आहेत. कृषी व कृषी संलग्न क्षेत्रात 'श्रम' हा घटक महत्त्वाचा असतो. अर्थशास्त्रात उत्पादनाचे चार घटक आहेत. भूमी, श्रम, भांडवल आणि संयोजक हे घटक आहेत. त्यापैकी श्रम (कामगार) हा एक महत्त्वाचा घटक समजला जातो. या श्रमिकांचे जीवनमान त्याला मिळणाऱ्या रोजगारावर अर्थात मोबदल्यावर अवलंबून असते.

भारतीय अर्थव्यवस्थेत वास्तवतेत श्रमिकांना किफायतशीर मोबदला मिळत, नसल्याचे दिसून येते. त्यामुळे त्यांच्या जीवनमानाचा स्तर निम्न प्रतीचा दिसून येतो. श्रमिकांच्या किंवा कामगारांच्या आर्थिक विकासात रोजगार किंवा प्रत्यक्ष मोबदला हा महत्त्वाचा आहे.

अर्थव्यवस्थेतील प्रत्येक क्षेत्रात (कृषी, उद्योग, सेवा व इतर) कामगार किंवा श्रमिक या घटकात अनन्य साधारण असे महत्व आहे. कामगारांना मिळणारा मोबदला हा त्यांच्या मानसिकतेवर व कार्यक्षमतेवर अवलंबून असते. या घटकांचा प्रभाव उत्पादन क्षमतेवर पडत असतो. यावरून देशातील सर्व क्षेत्रातील उत्पादन पातळी वाढविण्यासाठी कामगारांच्या मूलभूत प्रश्नांकडे लक्ष देणे

गरजेचे असते. श्रम हा उत्पादन घटकाच्या प्रक्रियेतील सर्वात महत्त्वाचा घटक आहे. तो मजूर, कारागीर, नोकरदार आणि शेतकरी हा उत्पादन क्षेत्रात सर्वात मौल्यवान घटक म्हणून ओळखला जातो. या प्रमाणे शासनाच्या पायाभूत सोयी सुविधा निर्माण करण्यात 'बांधकाम कामगार' हा महत्त्वाचा घटक आहे.

सध्या स्थितीत अर्थव्यवस्थेतील श्रमिकांना इतर क्षेत्रात कायमस्वरूपी काम न मिळणे व योग्य मोबदला न मिळणे, ही समस्या लक्षात घेता, अधिक - अधिक काम व योग्य मोबदला मिळेल, या अपेक्षेने पायाभूत सोयी सुविधाकडे हे कामगार श्रम करण्यासाठी प्राधान्य देत असल्याचे दिसून येते.

भारतात प्राचीन काळापासून बांधकाम कामगारांचा उल्लेख इतिहासात आढळून येतो. भारतात रस्ते बांधण्याची कामे हे प्राचीन काळापासून अस्तित्वात असल्याचे दाखले इतिहासात आपणास पहावयास मिळतात. प्राचीन भारतातील मौर्य साम्राज्यात इ.स. पूर्व तिसऱ्या शतकात त्यांनी महामार्ग बनविला आणि त्यास गंगानदीच्या मुखातून ते साम्राज्याच्या उत्तर-पश्चिम सीमेपर्यंत विस्तारित केल्याचे सांगितले जाते. यावरून असे लक्षात येते, की प्राचीन काळात रस्ते बांधण्याचे कार्य हे बांधकाम कामगारांकडून मोठ्या प्रमाणात केले जात असे.

बांधकाम कामगारांचा उल्लेख चंद्रगुप्त मौर्य नंतर 16 व्या शतकात उत्तर भारतात शेरशाह सुरीने गंगानदीच्या मैदानावर एक मोठा रस्ता बनविला ज्याला, सडक-ए-आजम म्हणून ओळखलं जात असे, आणि त्यांच्या विशाल साम्राज्याच्या दुर्गम प्रांतांना प्रशासकीय दुवा म्हणून काम केल्याचे आणि या मार्गाचे काम चालू असताना अनेक लोकांना रोजगार उपलब्ध झाल्याचे आढळते. आणि त्यानंतर भारतावर इंग्रजांची सत्ता असताना, लॉर्ड डलहौसीच्या काळात दळण-वळण, रेल्वेमार्ग, पुलाचे काम, रस्ते काम हे मोठ्या प्रमाणात झाल्याचे आढळते. भारत हा रस्ते नेटवर्कमध्ये जगात दुसऱ्या क्रमांकाचा देश म्हणून ओळखला जातो. भारतातील श्रमिकांना शेती व्यवसाय नंतर अधिक प्रमाणात काम मिळवून देणारे क्षेत्र म्हणजे रस्ते बांधण्याचे काम हे आहे.

महाराष्ट्रातील नांदेड हा जिल्हा मराठवाडा विभागातील एक ऐतिहासिक जिल्हा म्हणून ओळखला जातो. नांदेड हा जिल्हा पवित्र गोदावरी नदी वरील मध्यवर्ती क्षेत्र असल्यामुळे त्यास गोदावरीचे नाभीस्थान मानले जाते. नांदेड जिल्हा हा महाराष्ट्राच्या पठारावर वसलेला आहे व जिल्ह्याच्या अनेक बाजूने इतर राज्यांच्या सीमा लागून असून, नांदेड जिल्हा हा महाराष्ट्राच्या दक्षिण-पूर्व सीमेला दक्षिणोत्तर पसरलेला आहे. नांदेड हा जिल्हा 18.15° ते 19.55° उत्तरं अक्षाश व 77.7° ते 78.15° पूर्व रेखांश मध्ये स्थिर आहे. या जिल्ह्याला एकूण भौगोलिक क्षेत्रापैकी 12.35% वनक्षेत्र आहे.

महाराष्ट्राच्या एकूण क्षेत्रफळ पैकी 3.14% एवढे क्षेत्रफळ नांदेड जिल्ह्याचे आहे. एकूण क्षेत्रफळ 10,528 चौ.कि.मी. यापैकी नागरी भागाचे 241.31 (2.29) चौ.कि.मी एवढे क्षेत्रफळ असून 1029.9 (97.71) चौ.कि.मी ग्रामीण भागाचे आहे. प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने जिल्ह्याचे आठ महसूल उपविभाग आहेत. त्यामध्ये नांदेड, देगलूर, किनवट, कंधार, बिलोली, हदगाव, भोकर आणि मुखेड यांचा समावेश आहे. तसेच जिल्ह्यात एकूण सोळा तहसील व पंचायत समित्या आहेत.

2011 च्या जनगणनेनुसार नांदेड जिल्ह्याची एकूण लोकसंख्या 33,61,292 एवढी असुन त्यामध्ये पुरुषांची संख्या 17,30075 असुन महिलाची संख्या ही 16,31217 आहे. त्यात शहरी भागात राहणाऱ्यांची संख्या ही 9,13,898 (27.2%) एवढे असून ग्रामीण भागात राहणाऱ्यांची संख्या 24,47,394 (72.8) एवढी आहे. 2001 ते 2011 च्या दरम्यान नांदेड जिल्ह्यातील लोकसंख्या वाढीचा दर हा 16.90% एवढा होता. नांदेड जिल्ह्याची घनता ही 2001 मध्ये 274 चौ.कि.मी. एवढी होती. ती 2011 मध्ये 319 चौ.की.मी एवढी झाली होती.

देशातील मूलभूत कृषी, उद्योग, व सेवा क्षेत्राचा विकास प्रामुख्याने रोजगार पातळीवर अवलंबून असतो. रोजगार पातळी ही राहणीमान, उपभोग व उत्पादन या सारख्या वास्तव उत्पादन घटकावर परिणाम करते. अर्थव्यवस्थेतील स्थिरता ही संतुलित रोजगार पातळीमुळे टिकून राहते.

नांदेड जिल्ह्यातील क्षेत्र निहाय काम करणाऱ्या कामगारांचे एकूण दहा वर्गात वर्गीकरण करण्यात आले आहे. त्यात शेतकरी व शेतमजूर यांचे प्रमाण सर्वात जास्त आहे, ते अनुक्रमे 36.77% व 41.36% एवढे होते. द्वितीय क्षेत्रामध्ये (उद्योग, वस्तू निर्माण प्रक्रिया बांधकाम इत्यादी) काम करणाऱ्या कामगारांचे प्रमाण अतिशय अल्प म्हणजे 5.88% एवढे होते. तर तृतीय क्षेत्रामध्ये काम करणाऱ्याचे प्रमाण 6.67% एवढे होत.

समस्यासुत्रण :-

महाराष्ट्र राज्यात सार्वजनिक बांधकाम विभागा अंतर्गत काम करणाऱ्या कामगारांची आर्थिक परिस्थिती सुधारावी यासाठी कामगार मंत्रालय मार्फत अनेक योजना राबवीत असते. त्याआधारे त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारून त्यांचे राहणीमान सुधारणे अपेक्षित आहे. पण त्यांचे राहणीमानात पाहिजे तेवढी सुधारणा झाली नाही. त्यासाठी नांदेड जिल्ह्यातील श्रमिकांची आर्थिक परिस्थिती सुधारली आहे का? त्यांच्या उत्पादनात वाढ झाली आहे का? यांनी त्यांच्या कामात अवजारे वापरण्यात बदल केला आहे का? त्यांनी आधुनिक अवजारांचा वापर करणे सुरू केले आहे का? या सर्व प्रश्नांचा शोध घेणे हा या संशोधनाचा मुख्य हेतू आहे.

अध्ययन विषयाची निवड :-

भारतीय अर्थव्यवस्थेत बांधकाम व पायाभूत सोयी सुविधा या क्षेत्राला महत्त्वाचे स्थान आहे. जागतिकीकरण व आधुनिकीकरणाच्या युगात निवास, इमारती, रस्ते, पूल, महामार्ग, धरणे, उद्योग इत्यादीची उभारणी आधुनिक पद्धतीने विस्तारित केली जात आहे. यामध्ये प्रत्यक्ष श्रमदान करणारा 'बांधकाम कामगार' हा एक महत्त्वाचा घटक आहे. तो असंघटित लोकशक्तीचा एक भाग आहे, परंतु योग्य वेतनाभावी दर्जेदार राहणीमाना पासून वंचित राहिलेला दुर्लक्षित घटक आहे.

केंद्र शासनाकडून व राज्य शासनाकडून सार्वजनिक बांधकाम विभागात कामगारांच्या विकासासाठी भरपूर योजना राबविल्या जातात. मोठ्या प्रमाणात खर्चाची तरतूद केली जाते. पण प्रत्यक्षात तरतूद केलेला खर्च पूर्ण केला जात नसल्याचे दिसून येते. या योजनांची कामगारांना कितपत माहिती आहे, आणि या योजनांचा लाभ प्रत्यक्षात लाभार्थी कामगारांना कितपत मिळत आहे. या योजनेच्या माध्यमातून त्यांच्या गुणात्मक व संख्यात्मक बदल कितपत झाला याचा अभ्यास करणे गरजेचे आहे. त्याचबरोबर या कामगारांचे दारिद्र्य, निरक्षरता, रहाणीमान, पारंपरिक सवयी इत्यादी मध्ये अपेक्षित बदल घडून येत आहे का? याचाही अभ्यास करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

संशोधन आराखडा :-

संशोधनाच्या उद्देशाची प्राप्ती आणि संशोधनाला सुयोग्य दिशा देण्यासाठी या संबंधित संशोधन आराखडा तयार केला जातो. संशोधन समस्याचा विचार पूर्वक अंदाज घेऊन त्या समस्यांच्या आराखड्याचे स्वरूप निश्चित करावे लागते. प्रत्येक संशोधन आराखड्याचे विशेष महत्त्व आहे. प्रस्तुत संशोधनाचा उद्देश "नांदेड जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम विभागा अंतर्गत काम करणाऱ्या कामगारांचा आर्थिक परिस्थितीचा अभ्यास" या विषयाचे वर्णन करणे असल्याने, वर्णनात्मक संशोधन आराखडा अवलंब करण्यात आला आहे. त्या आधारे संशोधनाची दिशा ठरवून तथ्य संकलनासाठी बहुतांशी व अंशतः संख्यात्मक दृष्ट्या अध्ययन केले. त्या आधारे मिळालेल्या माहितीचे वर्गीकरण निकर्ष काढले आहे.

अध्ययन विषयाचे महत्त्व :-

पायाभूत सोयी सुविधा यामध्ये बांधकाम क्षेत्र कामगारांच्या दृष्टीने सर्वात जास्त रोजगार मिळवून देणारा देशातील सर्वात मोठे क्षेत्र असल्याचे दिसून येते. या क्षेत्रातील कामगारांच्या आर्थिक घटकावर पाहिजे तसा अभ्यास झालेला दिसून येत नाही. त्यामुळे हा एक महत्त्वाचा अभ्यास विषयक घटक आहे

हे सांगता येते. बांधकाम कामगारांना केंद्र व राज्य सरकारच्या अनेक योजनांचा प्रत्यक्षात माहिती मिळावी व याचा फायदा घेता यावा यासाठी या विषयाचा अभ्यास करण्याची गरज निर्माण झाली. या माध्यमातून कामगारांच्या आर्थिक परिस्थिती विषयी सत्य माहिती प्राप्त होईल. आणि या माहितीचा उपयोग शासन व नियोजन करतांना योग्य धोरण आखण्यासाठी उपयोगात येईल.

संशोधन विषयाची उद्‌दिष्टे :-

'नांदेड जिल्हयातील सार्वजनिक बांधकाम विभागा अंतर्गत काम करणाऱ्या कामगारांच्या आर्थिक परिस्थितीचा अभ्यास' करताना आर्थिक घटक महत्त्वाचे मानले आहेत. प्रस्तुत संशोधनासाठी पुढील उद्‌दिष्टे निश्चित करण्यात येणार आहेत.

1) रोजगार निर्मिती विषयक घटकांचा अभ्यास करणे.
2) मजुरी निश्चित करण्यात कामगार संघटनांच्या भूमिकेचा अभ्यास आणि बांधकाम कामगारा संबंधित शासकीय कल्याणकारी उपाय योजनांची अंमलबजावणी करणे.
3) बांधकाम विकासाची संबंधित विविध कायद्‌यांची अंमलबजावणी जाणून घेणे.
4) बांधकाम विकासात कामगारांच्या वेतनाचे श्रम मोबदल्याचे अकलान करणे.
5) बांधकाम कामगारांच्या दारिद्र्याचा व राहणीमानाचा अभ्यास करणे.

संशोधनाची गृहीतकृत्ये :-

संशोधन विषयासंबंधी असणाऱ्या पूर्व ज्ञानाच्या आधारे तसेच त्या विषयाच्या विविध पैलूच्या केलेल्या अभ्यासाच्या आधारे संशोधक समस्यांची उत्तरे शोधतो आणि त्यांच्या आधारे सिद्धांताची मांडणी करीत असतो. या संभाव्य उत्तरांना किंवा अनुमान यांना गृहीतकृत्ये असे म्हणतात.

व्याख्या :-

'गुड आणि हॅट' याच्या मते :- "गृहीतकृत्ये म्हणजे असे विधान आहे. की, ज्याची सप्रमाण ठरविण्यासाठी परीक्षण केले जाते आणि ते पुढील संशोधनासाठी उपयुक्त असते."

1) पुरुष व महिला रस्ते कामगारांच्या वेतनामध्ये असमानता असते.
2) बांधकाम कामगार विविध शासकीय कल्याणकारी सेवेपासून वंचित आहेत.
3) बांधकाम कामगारांसाठी रस्त्यांच्या कंत्राटदाराकडून कामाच्या ठिकाणी प्रभावी सुरक्षा व उपाय योजना दिसून येत नाहीत.
4) बांधकाम कामगार निरीक्षर व असंघटित आहेत.
5) बांधकाम कामगारांचे जीवनमान निकृष्ट व दारिद्र्यातील आहे.

संशोधन पद्धती :-

कोणत्याही संशोधनासाठी उपयुक्त अशा संशोधन पद्धतीचा वापर करावा लागतो. त्याशिवाय संशोधनाची प्रक्रिया पूर्ण होऊ शकत नाही. त्यामुळे प्रस्तुत संशोधन हाच या अभ्यासासाठी सामाजिक संशोधन पद्धती अंतर्गत वापर करण्यात येणार आहे. त्यामध्ये "नांदेड जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम विभागा

अंतर्गत काम करणाऱ्या कामगारांच्या आर्थिक परिस्थितीचा अभ्यास” करण्यात येणार आहे.

तथ्य संकलन :-

प्राथमिक सामग्री :-

प्रस्तुत संशोधनासाठी प्रामुख्याने प्राथमिक सामग्रीचा आधार घेण्यात येणार आहे. त्यासाठी प्रत्यक्षात अनेक विभागाची मुलाखती घेऊन प्रश्नावली द्वारे प्रश्न विचारून त्याची निरीक्षण करून माहिती संकलन करण्यात येणार आहे.

दुय्यम सामग्री :-

प्रस्तुत संशोधनासाठी दुय्यम सामग्री जमा करण्यासाठी विविध क्षेत्रातील संदर्भ ग्रंथ, पुस्तके, शासकीय कार्यालय, सार्वजनिक बांधकाम विभाग, समित्या अहवाल, जिल्हा सांख्यिकी कार्यालय, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र राज्याची जनगणना, अहवालाची माहितीचा आधार घेण्यात येणार आहे.

नमुना निवड :-

प्रस्तुत संशोधनासाठी ‘नांदेड जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम विभागा अंतर्गत काम करणाऱ्या कामगाराच्या आर्थिक परिस्थितीचा अभ्यास’ करण्यासाठी प्रत्यक्षात जाऊन प्रश्नावली द्वारे तथ्य गोळा करण्यासाठी जाणार आहे. त्यासाठी संभाव्य नमुना निवड पद्धतीतील यादृच्छिक नमुना निवड पद्धतीचा अवलंब केला जाणार आहे. नांदेड जिल्ह्यातील 16 तालुके असून त्यापैकी

आठ नांदेड, हदगाव, किनवट, भोकर, देगलूर, कंधार, बिलोली, मुखेड इत्यादी. ची निवड करण्यात येईल. व या तालुक्यातील 350 नमुना निवड करण्यात येईल. बांधकाम कामगार यांची निवड करून त्यांचा अनुभव माहिती संदर्भाने मुलाखती घेऊन नमुना निवड केली जाणार आहे.

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :-

प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती ही नांदेड जिल्हयातील नांदेड, हदगाव, किनवट, भोकर, कंधार, बिलोली, मुखेड, देगलूर या आठ तालुक्यात पुरतीच मर्यादित राहील. व या तालुक्यातील जास्तीत जास्त बांधकाम कामगारांची संख्या असलेल्या तालुक्याला प्राधान्य देऊन बांधकाम कामगारांच्या आर्थिक परिस्थितीचा अभ्यास केला जाईल. नांदेड जिल्हयातील बांधकाम कामगारांच्या विविध शासकीय योजनांचा अभ्यास करून. 350 बांधकाम कामगारांच्या संदर्भाने हे संशोधन केले जाणार आहे.

संशोधनाचा कालखंड :-

प्रस्तुत संशोधनाचा कालखंड 2010-11 ते 2020-21 असा निश्चित करण्यात आला आहे

प्रकरणाची रूपरेषा :-

प्रस्तुत संशोधन विषयाच्या अभ्यासासाठी प्रकरणाची मांडणी खालील प्रमाणे करण्यात आलेली आहे.

1) **प्रकरण पहिले :- प्रस्तावना**

विषय प्रवेशाच्या याप्रकरणात सादर विषयाच्या अनुषंगाने माहितीची अभ्यासात्मक पायाभरणी करण्यात येणार आहे.

2) **प्रकरण दुसरे :- संदर्भ साहित्याचे सिंहावलोकन**

अभ्यासाचे हे दुसरे प्रकरण असल्याने यापूर्वी प्रकाशित झालेल्या साहित्याच्या आढावा घेतला जाणार आहे. त्यामुळे या प्रकरणात संशोधन विषयाची व्याप्ती, दिशा स्पष्ट होणार आहे. त्या अनुषंगाने हे प्रकरण असणार आहे. तसेच संशोधनासाठी उपयुक्त असलेल्या संशोधन पद्धतीचा आढावा, उद्दिष्टे, गृहीतकृत्य, संशोधन आराखडा, नमुना निवड व तथ्य संकलनाची माहिती या आधारे ही संशोधनाची विश्लेषण करण्यात येणार आहे.

3) **प्रकरण तिसरे :- भारत आणि महाराष्ट्र राज्यातील सार्वजनिक बांधकाम विभाग**

प्रस्तुत संशोधनाच्या आधार घेऊन भारत आणि महाराष्ट्र राज्यातील सार्वजनिक बांधकाम विभाग अंतर्गत येणाऱ्या कामगारांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करण्यात येणार आहे.

4) **प्रकरण चौथे :- बांधकाम कामगारांची आर्थिक परिस्थिती**

अभ्यासाचे हे चौथें प्रकरण असल्याने यात सार्वजनिक बांधकाम विभागात अंतर्गत येणाऱ्या कामगारांच्या आर्थिक परिस्थितीचा अभ्यास करण्यात येणार आहे. व त्यांना अनेक आर्थिक समस्यांना व त्यांचे

उत्पन्न राहणीमान विषयक समस्यांची विश्लेषण सादर प्रकरणात करण्यात येणार आहे.

5) **प्रकरण पाचवे :- शासकीय कामगार कायदे व सामाजिक सुरक्षा कामगार कल्याणयोजना आणि रस्ते बांधकाम कामगार मजूर**

6) **प्रकरण सहावे :- निकष आणि शिफारशी**

या प्रकरणात सार्वजनिक बांधकाम विभागा अंतर्गत कामगारांचा थोडक्यात आढावा घेऊन. त्यांच्या समस्येची कारणेमीमांसा करून विविध निष्कर्ष काढण्यात येतील अनेक समस्यांची सोडवणूक करण्यासाठी विविध उपाय करून प्रस्तुत संशोधन पद्धती सुचविण्यात येतील.

- संदर्भसूची
- परिशिष्टे

संदर्भ साहित्य :-

1) संशोधन पद्धती शास्त्र व तंत्रे - प्रदीप आगलावे
2) जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन - 2020
3) महाराष्ट्र आर्थिक आकडेवारी - 2020
4) शासकीय कर्मचाऱ्यांचा सवकष माहितीकोष - 2015 अहवाल
5) Economic survey of Maharashtra 2018-19
6) Mahades.Maharashtra.go.in (directorate of economics and statistics)
7) www.beingtraveler .com
8) इंडियन रोड इंडस्ट्री रिपोर्ट
9) सार्वजनिक बांधकाम विभाग वेबसाईट https://pwd.maharashtra.gov.in

संशोधक **मार्गदर्शक**

सय्यद फैसलोद्दीन आरिफोद्दीन **प्रा. डॉ. आर. व्हि. किर्तनकार**

सहयोगी प्राध्यापक व

. **मार्गदर्शक अर्थशास्त्र विभाग**

नारायणराव वाघमारे महाविद्यालय,

आ. बाळापूर ता. कळमनुरी जि.हिंगोली